# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:19.08.2025** **वार:मंगळवार**

1. राज्याच्या बहुतांश भागात मुसळधार पाऊस, जनजीवन विस्कळीत; आतापर्यंत सात जणांच्या मृत्यूची नोंद
2. आगामी दोन दिवसातही अनेक जिल्ह्यात मुसळधार पावसाचा इशारा; मुंबई ठाण्यासह विविध जिल्ह्यांत आज शाळांना सुटी जाहीर
3. राज्यातल्या पर्जन्य परिस्थितीचा मुख्यमंत्र्यांनी घेतला आढावा, सर्व यंत्रणांना सतर्कतेचे आदेश आणि
4. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार; राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी घेतली पंतप्रधानांची सदिच्छा भेट

**पाऊस**

राज्याच्या बहुतांश भागात काल जोरदार पाऊस पडला. विशेषतः मुंबई ठाणे कोकण आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना पावसानं अक्षरशः झोडपून काढलं. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं असून पावसामुळे झालेल्या विविध दुर्घटनांमध्ये सात जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. ठिकठिकाणच्या नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली असून अनेक धरणांमधून मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरू आहे; त्यामुळे नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. या पावसामुळे शेतीचंही मोठं नुकसान झालं आहे.

**मुंबई आणि उपनगरात** काल जोरदार पावसामुळे सखल भागात पाणी साचलं होतं. उपनगरी रेल्वे आणि रस्ते वाहतूकही मंदावली होती. मिठी नदीत एकजण वाहून गेल्याचं वृत्त आहे. **ठाणे, नवी मुंबई, पालघर** आणि **रायगड**मध्येही काल पावसानं जोरदार हजेरी लावली.

**रत्नागिरी** जिल्ह्यात काल दिवसभर पावसाचा जोर कायम होता; त्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. खेड तालुक्यातल्या जगबुडी नदीनं धोका पातळी ओलांडली असून राजापुरातली कोदवली नदी इशारा पातळी ओलांडून वाहत आहे. दरम्यान संगमेश्वर तालुक्यात आंबा घाटात कोसळलेली दरड बाजूला केल्यानंतर एकेरी वाहतूक सुरू झाली आहे. **सिंधुदुर्ग** जिल्ह्याच्या काही भागात काल मुसळधार पाऊस पडला; सखल भागातल्या पुलांवर पाणी आल्याने काही ठिकाणी वाहतूक ठप्प झाली.

मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पालघर, रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यातील शाळांना आज सुटी जाहीर करण्यात आली आहे. मुंबई विद्यापीठाच्या आज होणाऱ्या परीक्षाही पुढे ढकलल्या असून त्या आता 23 ऑगस्ट रोजी होतील.

**कोल्हापूर** शहर आणि जिल्ह्यामध्येही पावसाची संततधार होती; यंदा पावसाळ्यात पहिल्यांदाच राधानगरी धरणाचे सर्व स्वयंचलित उघडले आहेत. **सातारा आणि सांगली** जिल्ह्यातही संततधार पावसामुळे धरणांच्या पाणी पातळीत वाढ झाली असून विविध धरणांमधून मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरू आहे, त्यामुळे नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**नांदेड** जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पूरस्थिती असून पुरात अडकलेल्या तीन महिलांचा काल मृत्यू झाला; तर दोघांचा शोध सुरू आहे. नांदेड जिल्ह्यात आतापर्यंत पुराचे पाच बळी गेले आहेत. अनेक गावांमध्ये पाणी शिरलं असून पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात राज्य आपत्ती प्रतिसाद दलासह लष्करालाही पाचारण करण्यात आलं आहे.

**बीड** जिल्ह्यातील पाच तालुक्यांमध्ये अतिवृष्टी झाली असून, परळी तालुक्यात झालेल्या जोरदार पावसाने लिंगी नदीला आलेल्या पुरात चार युवक पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले होते. त्यापैकी तीन जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आलं तर एका युवकाचा मृतदेह सापडला आहे.

**<u>लातूर</u>** जिल्ह्याच्या उदगीर तालुक्यात लेंडी नदीच्या उपनदीला आलेल्या पुरात अनेक जनावरं वाहून गेली आहेत. गावातील 70 घरांमध्ये पुराचं पाणी शिरलं असून दोनशेहून जास्त व्यक्तींना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आलं आहे.

**<u>जालना, हिंगोली, बुलढाणा आणि वाशिम</u>** जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला असून, अनेक गावांमध्ये पूर परिस्थिती आहे. हजारो हेक्टर शेती पाण्याखाली गेली आहे. अनेक रस्ते वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आले आहेत.

**<u>मुख्यमंत्री-पावसाचा आढावा</u>**

राज्यातील अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सविस्तर बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. गेल्या दोन दिवसांत पावसाशी संबंधित विविध घटनांमध्ये सात जणांचा मृत्यू झाल्याची माहिती त्यांनी दिली. राज्याच्या विविध भागांमधल्या परिस्थितीची तपशीलवार माहिती देऊन, रत्नागिरी, रायगड आणि हिंगोली जिल्ह्यांमध्ये जास्त पाऊस झाला असून तिथल्या नागरिकांनी पुढचे काही दिवस सतर्क राहावं, असं आवाहन त्यांनी केलं.

यावेळी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागांचे पंचनामे करण्याचे आदेश त्यांनी दिले. मराठवाड्यातल्या 800 गावांना अतिवृष्टीचा फटका बसला असून 1 लाख हेक्टर शेतीचं नुकसान झालं असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. अतिवृष्टीमुळे राज्याच्या विविध भागांत पिकांच्या झालेल्या नुकसानीबद्दल मुख्यमंत्री म्हणाले…

**संपूर्ण महाराष्ट्रात एकूण चार लाख हेक्टर जमीन आहे. ही त्याच्यावरची पिकं जी आहेत, ती पिकं पावसामुळे बाधित झालेली आहेत. आणि याच्यामध्ये विशेषतः यवतमाळ, नांदेड, वर्धा, बीड, वाशिम वगैरे हा जो सगळा भाग आहे याच्यामध्ये जास्तीत जास्त सर्कलमध्ये म्हणजे वाईड स्प्रेड अशा प्रकारचं नुकसान जास्तीत जास्त सर्कलमध्ये हे या ठिकाणी दिसतंय, जे काही नुकसान झालेलं आहे. जनावरांचं आणि घरांचं किंवा लोक मृत्युमुखी काही प्रमाणात जिथे पडलेले आहेत. यासंदर्भात सगळे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत. आणि त्यांना निधी देखील उपलब्ध करून दिलेल्या उन्हे पद्धतीने त्यांना निधी विथड्रॉ करता येतो. काही ठिकाणी लोकांना तात्पुरत्या निवाऱ्यात जे हलवावं लागतं, त्या ठिकाणी चांगली त्यांची जेवणाची सोय झाली पाहिजे, पिण्याचं स्वच्छ पाणी मिळालं पाहिजे अशा प्रकारचे आदेश देखील आपण दिलेले आहेत. आणि पिकाचे जे काही नुकसान झालं आहे त्यासंदर्भात एक इंटेन्सिव्ह अशा प्रकारची पाहणी करून त्याचेही पंचनामे करण्याचे आदेश दिलेले आहेत**.

**<u>इशारा महासंवाद</u>**

येत्या 24 तासात मुंबई, ठाणे, रायगड तसंच पुणे, सातारा, रत्नागिरी, आणि कोल्हापूरच्या घाट परिसरात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला असून पालघर, सिंधुदुर्ग, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, अमरावती, चंद्रपूर आणि गडचिरोली या भागात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. या काळात समुद्र खवळलेला असेल; त्यामुळे मच्छीमारांनी समुद्रात जाऊ नये, अशा सूचना दिल्या आहेत.

**<u>पंतप्रधान-राज्यपाल भेट</u>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार म्हणून महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचं नाव घोषित झाल्यानंतर काल त्यांनी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदीच्छा भेट घेतली. राधाकृष्णन हे अनुभव समृद्ध असून, विविध पदांवर काम करताना त्यांनी समाजाची सेवा आणि उपेक्षितांना सक्षम बनवण्यावर भर दिल्याचं पंतप्रधानांनी समाजमाध्यमांवर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचं अभिनंदन केलं. येत्या 9 सप्टेंबरला उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक होणार आहे.

**<u>संसद</u>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विरोधकांनी कालही विविध मुद्द्यांवरून दोन्ही सभागृहांमध्ये जोरदार घोषणाबाजी केली. विविध मुद्द्यावरून दोन्ही सदनात गदारोळ सुरूच राहिल्यानं दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आलं. तत्पूर्वी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणारे भारताचे पहिले अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव काल दोन्ही सभागृहात मंजूर करण्यात आला.

**<u>मुख्यमंत्री-तलवार</u>**

श्री राजे रघुजी भोसले यांच्या ऐतिहासिक तलवारीचं प्रदर्शन आणि लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या प्रमुख उपस्थितीत काल मुंबईत पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी इथं झालं. इतिहासाशी नवीन पिढीला जोडण्याची भूमिका श्रीमंत राजे रघुजी भोसले यांच्या ऐतिहासिक तलवारीने पार पाडली आहे. नागपूरसह इतर ठिकाणी ही तलवार पोहोचेल आणि त्यामुळे आपल्या हिंदवी स्वराज्याचा विस्तार कसा झाला, हे नवीन पिढीपर्यंत पोहोचेल, असं प्रतिपादन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

**<u>मुख्यमंत्री</u>**

मुंबई महानगरक्षेत्राच्या विकासासाठी रायगडमध्ये विकसित करण्यात येणारी तिसरी मुंबई म्हणजे आर्थिक विकासाचा नवा अध्याय असेल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. गोल्डमन सॅक्स या आंतरराष्ट्रीय गुंतवणूक बँकेच्या नव्या, विस्तारित मुंबई कार्यालयाचं उद्घाटन काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं त्यावेळी गुंतवणूकदारांशी चर्चा करताना ते बोलत होते. महाराष्ट्र शासन विकासासाठी कटिबद्ध असून, खासगी क्षेत्रातल्या भागीदारीतून 'तिसरी मुंबई' घडवण्यासाठी कार्यरत आहे. याठिकाणी आंतरराष्ट्रीय विद्यापीठं उभारण्यात येत आहेत. मुंबई आणि महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीसाठी हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. मुंबईच्या विकासाला आणखी गती देण्याचं काम ही तिसरी मुंबई करेल, असंही मुख्यमंत्री म्हणाले.

**<u>एकनाथ शिंदे</u>**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरात ज्योतिर्लिंगाचं दर्शन घेऊन विधिवत पूजा केली. राज्यातील बळीराजा सुखी होऊ दे. राज्यातील सर्व जनतेच्या जीवनात सुख, समाधान, आनंदाचे दिवस येऊ दे, अशी प्रार्थना भीमाशंकर चरणी केल्याचं शिंदे यावेळी म्हणाले.

**<u>आग-अहिल्यानगर</u>**

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या नेवासा इथं रविवारी रात्री एका फर्निचरच्या दुकानाला लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातल्या पाच जणांचा मृत्यू झाला. तर एक जण जखमी झाला आहे. आगीचा भडका इतका तीव्र असल्यानं या कुटुंबीयांना बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही. आगीचं नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार